**Dr. Amiya Kumar Sahu , Founder President of NSWAI awarded as Paryavaran Bhushan by Maharashtra Pollution Control Board (MPCB) & Environmental Club of India (ECI) on 11 june,2016 at Patrakar Bhawan , Pune.**


संस्थापक : स्व. श्री रामगोपाल माहेश्वरी

नवभारत

1934 से

er.navabharat.co.in ■ पृष्ठ : 10 + 4 ■ पुणे, गुरुवार 9 जून, 2016 ■ मूल्य : ₹ 4.00 ज्येष्ठ शुक्ल 5


## साहू को पर्यावरण भूषण पुरस्कार

संवाददाता

पुणे. विश्व पर्यावरण दिवस के उपलक्ष्य में महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडल और एन्वॉर्नमेंटल क्लब ऑफ इंडिया के संयुक्त तत्वावधान से दिया जानेवाला पर्यावरण भूषण पुरस्कार इस वर्ष नेशनल सॉलीड वेस्ट एसोसिएशन के अध्यक्ष डॉ. अमिया कुमार साहू को घोषित किया गया है. एन्वॉर्नमेंटल क्लब ऑफ इंडिया के संस्थापक किरण कुलकर्णी ने बताया कि 11 जून को शाम 6.30 बजे पत्रकार भवन में होनेवाले कार्यक्रम में डॉ. साहू को सम्मानित किया जाएगा. दूसरे सत्र में पर्यावरण पूरक कार्य करनेवाले राज्य के कारखाना, निर्माण कार्य व्यवसाय कंपनी, हॉस्पिटल्स को सम्मानित किया जाएगा. इसमें संजय कांबले, वीरेंद्र चित्राव, किरण पुरंदरे, प्रकाश म्हसके, राहुल धड़फले, डॉ. सोनटक्के, पी. मिराशे, नंदकुमार गुरव, अजीत कुडे को सम्मानित किया जाएगा.


प्रभात

Download Apps : www.dainikprabhat.com or www.eprabhat.net प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे

पुणे । गुरुवार । दि. ९ जून २०१६ PRABHAAT । प्रेस रजिस्ट्रेशन नं. १६३९/१९५७, वर्ष ८५, अंक : १५८


## अमियाकुमार साहू यांना पर्यावरण भूषण पुरस्कार



पुणे, दि. ८ (प्रतिनिधी) - महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा पुणे विभाग आणि एन्व्हायरमेंटल क्लब ऑफ इंडिया यांच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त दिला जाणारा पर्यावरण भूषण पुरस्कार यंदा नॅशनल सॉलीड वेस्ट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अमियाकुमार साहू यांना प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती अध्यक्ष नितीन देशपांडे आणि संस्थापक-अध्यक्ष डॉ. किरण कुलकर्णी यांनी दिली.

यावेळी आमोद घमंडे, गणेश शिरोडे, प्रसिद्धी प्रमुख मुकुंद परदेशी उपस्थित होते. देशपांडे म्हणाले की, प्रदूषण नियंत्रण मंडळाचा पुणे विभाग आणि एन्व्हायरमेंटल क्लबतर्फे वर्षभर पर्यावरणविषयक विविध उपक्रम राबविले जातात. त्याचाच एक भाग म्हणून डॉ. अमियाकुमार साहू यांना यंदाचा पर्यावरण भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. मानचिन्ह आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. सदर पुरस्कार वितरण सोहळा शनिवारी (दि. ११) संध्याकाळी ६.३० वाजता पत्रकार भवन येथे होणार आहे.


लोकमत

महाराष्ट्राचा मानबिंदू

पृष्ठे : २६ (१०+८+CNX/८) किंमत : ₹ ४.०० पुणे, गुरुवार, दि. ९ जून २०१६


## अमियाकुमार साहू यांना पुरस्कार



पुणे : नॅशनल सॉलिड वेस्ट असोसिएशनचे अध्यक्ष अमियाकुमार साहू यांना जागतिक पर्यावरण दिनानिमित्त यंदाचा पर्यावरणभूषण हा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा पुणे विभाग आणि एन्व्हायर्न्मेंटल क्लब ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ११ जून रोजी हा पुरस्कार सोहळा पार पडणार असल्याची माहिती, एन्व्हायर्न्मेंटल क्लब ऑफ इंडियाचे अध्यक्ष नितीन देशपांडे आणि संस्थापक-अध्यक्ष डॉ. किरण कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हा कार्यक्रम दि. ११ जून रोजी संध्याकाळी ६ वाजता पत्रकार भवन येथे पार पडणार आहे. डॉ. किरण कुलकर्णी म्हणाले, 'या सोहळ्यात पर्यावरणपूरक कामगिरी करणारे आणि उपक्रम राबवणारे राज्यातील कारखाने, बांधकाम व्यवसाय कंपन्या, हॉस्पिटल, हॉटेल यांना सन्मानित करण्यात येईल. संजय कांबळे, वीरेंद्र चित्राव, किरण पुरंदरे, प्रकाश म्हस्के, राहुल धडफळे, समीर जोशी, अजित कुडे, डॉ. वाय. बी. सोनटक्के, पी. के. मिराशे, नंदकुमार गुरव व्यक्तींचाही गौरव करण्यात येणार आहे.' या वेळी पाणीतज्ज्ञ डॉ. हिमांशू कुलकर्णी 'भूगर्भातील पाण्याचे प्रवाह जिवंत करण्याची गरज' याबाबत मार्गदर्शन करतील. (प्रतिनिधी)

**Dr. Amiya Kumar Sahu , Founder President of NSWAI awarded as Paryavaran Bhushan by Maharashtra Pollution Control Board (MPCB) & Environmental Club of India (ECI) on 11 june,2016 at Patrakar Bhawan , Pune.**

## अमिया कुमार साहू यांना 'पर्यावरणभूषण'



पुणे, ता. ८ : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ पुणे विभाग व एन्व्हायर्नमेंटल क्लब ऑफ इंडियातर्फे नॅशनल सॉलिड वेस्ट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अमिया कुमार साहू यांना 'पर्यावरणभूषण पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे.

पुरस्कार वितरण सोहळ्यात पर्यावरणपूरक कामगिरी करणारे आणि उपक्रम राबविणारे राज्यातील कारखाने, बांधकाम व्यवसाय कंपन्या, रुग्णालये आदींना स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. पुरस्काराचे वितरण शनिवार (ता. ११) होणार आहे, अशी माहिती क्लबचे अध्यक्ष नितीन देशपांडे यांनी दिली.



## अमिया कुमार साहू यांना पर्यावरण भूषण पुरस्कार

प्रतिनिधी, पुणे



महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा पुणे विभाग आणि एन्व्हायर्नमेंटल क्लब ऑफ इंडिया यांच्यातर्फे नॅशनल सॉलिड वेस्ट असोसिएशनचे अध्यक्ष अमिया कुमार साहू यांना पर्यावरण भूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

एस. एम. जोशी सभागृह येथे शनिवारी (११ जून) सायंकाळी साडेसहा वाजता होणाऱ्या कार्यक्रमात साहू यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. पर्यावरणपूरक उपक्रम राबविणारे राज्यातील कारखाने, बांधकाम व्यावसायिक, हॉटेल्स आणि रुग्णालये यांनाही या वेळी सन्मानित करण्यात येणार आहे. संजय कांबळे, वीरेंद्र चित्राव, किरण पुरंदरे, प्रकाश म्हस्के, राहुल धडफळे, डॉ. वाय. बी. सोनटक्के, पी. के. मिराशे, नंदकुमार गुरव, अजित कुडे यांच्यासह किर्लोस्कर ऑइल इंजिन, फोर्ब्ज मार्शल आणि प्लास्ट इंडिया या कंपन्यांचा त्यामध्ये समावेश आहे, अशी माहिती एन्व्हायर्नमेंटल क्लब ऑफ इंडियाचे अध्यक्ष नितीन कुलकर्णी आणि संस्थापक-अध्यक्ष डॉ. किरण कुलकर्णी यांनी दिली.

पितरों को श्रद्धा के सुमन चढ़ायें पितृ मोक्षदायक तीर्थ नैमिषारण्य
पितृ पक्ष के शुभ अवसर पर
पितृ तर्पण महायज्ञ
श्रीमद्भागवत / रामायण
दि.:21 से 28 सितम्बर, 2016 स्थान: कालीपीठ, नैमिषारण्य

**Dr. Amiya Kumar Sahu , Founder President of NSWAI awarded as Paryavaran Bhushan by Maharashtra Pollution Control Board (MPCB) & Environmental Club of India (ECI) on 11 june,2016 at Patrakar Bhawan , Pune.**

पुणे, गुरुवार, ९ जून २०१६ । किंमत ₹ ४

सकाळ

## अमिया कुमार साहू यांना 'पर्यावरणभूषण'



पुणे, ता. ८ : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ पुणे विभाग व एन्व्हायर्नमेंटल क्लब ऑफ इंडियातर्फे नॅशनल सॉलिड वेस्ट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अमिया कुमार साहू यांना 'पर्यावरणभूषण पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे.

पुरस्कार वितरण सोहळ्यात पर्यावरणपूरक कामगिरी करणारे आणि उपक्रम राबविणारे राज्यातील कारखाने, बांधकाम व्यवसाय कंपन्या, रुग्णालये आदींना स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. पुरस्काराचे वितरण शनिवार (ता. ११) होणार आहे, अशी माहिती क्लबचे अध्यक्ष नितीन देशपांडे यांनी दिली.

अमृतमहोत्सवी

स्थापना १९३९ ७५ अमृतमहोत्सवी दैनिक

पुढारी

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

www.pudhari.com

पुणे

शुक्रवार । १० जून २०१६ । स्थापना वर्ष ७८ वे । आवृत्ती वर्ष ९ । मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, नाशिक, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अहमदनगर, सोलापूर, बेळगाव, गोवा येथून एकाच

संक्षिप्त

## अमिया कुमार साहु यांना 'पर्यावरण भूषण पुरस्कार' जाहीर



**पुणे :** महाराष्ट्र नियंत्रण मंडळ पुणे विभाग आणि एन्व्हायर्मेंटल क्लब ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने नॅशनल सॉलीड वेस्ट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अमिया कुमार साहु यांना जागतिक पर्यावरण दिनानिमित्त यंदाचा पर्यावरण भूषण पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती एन्व्हायर्मेंटल क्लब. ऑफ इंडियाचे अध्यक्ष नितीन देशपांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. हा पुरस्कार सोहळा दिनांक ११ जून रोजी सायंकाळी साडेसहा वाजता पत्रकार भवन नवी पेठ येथे आयोजित करण्यात आला आहे, असे देशपांडे यांनी सांगितले. यावेळी डॉ. किरण कुलकर्णी, सचिव अमोद घमंडे, खजिनदार गणेश शरिंडे आदी उपस्थित होते.

Sakal Times

◆ FRIDAY JUNE 10, 2016 ◆ Pages 12 + 4 = 16 (Including Plus 4 supplement) ◆ Price ₹ 3.00

## Amiya Sahu to be honoured with Environmental Award

ST CORRESPONDENT
reporters@sakaaltimes.com

**Pune:** Amiya Kumar Sahu, founder of National Solid Waste Association of India (NSWAI), will be honoured with the Environmental Award.

"Maharashtra Pollution Control Board (MPCB), Pune and Environment Club of India (ECI) have jointly decided to confer the Environmental Award on the occasion of World Environment Day," said President of ECI, Nitin Deshpande.

Founder President of ECI Kiran Kulkarni; Secretary Amod Ghamande; Treasurer Ganesh Sherode and other office-bearers were present at the press conference.

"There are various initiatives which are taken in the field of environment. Such awards encourage people like us to work with more determination," said Deshpande. The award ceremony will be held on June 11 at Patrakar Bhavan. The award will include a memonto and a certificate.

Kulkarni informed the media, "During this award ceremony eco-friendly factories, hotels, hospitals and counstruction companies will also be awarded. Sanjay Kamble, Virender Chitrav, Kiran Purandare, Prakash Mhaske, Rahul Dhadphale, YB Sontakke, PK Mirashe, Nandakumar Gurav and Ajit Kude are among the people who will recieve the award. Kirloskar Oil Engines and Forbes Marshall, Plast India will also receive the award."

**Dr. Amiya Kumar Sahu , Founder President of NSWAI awarded as Paryavaran Bhushan by Maharashtra Pollution Control Board (MPCB) & Environmental Club of India (ECI) on 11 june,2016 at Patrakar Bhawan , Pune.**

ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक
सामना
वर्ष : २१ अंक : १३६ | पृष्ठे १० | मूल्य : ३.०० रुपये | ★★ पुणे आवृत्ती

## अमिया कुमार साहू यांना 'पर्यावरणभूषण पुरस्कार' जाहीर

**महाराष्ट्र** प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे विभाग आणि एन्व्हायर्नमेंटल क्लब ऑफ इंडियातर्फे पर्यावरण क्षेत्रातील योगदानासाठी देण्यात येणारा 'पर्यावरणभूषण पुरस्कार' यंदा नॅशनल सॉलिड वेस्ट असोसिएशनचे अध्यक्ष अमिया कुमार साहू यांना जाहीर झाला आहे. स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र आणि रोख रक्कम असे पुरस्काराचे स्वरूप आहे. शनिवारी (दि. ११) नवी पेठेतील पत्रकार भवन येथे सायंकाळी पुरस्कार वितरण करण्यात येणार आहे. अशी माहिती एन्व्हायर्नमेंटल क्लब ऑफ इंडियाचे नितीन देशपांडे यांनी दिली. डॉ. किरण कुलकर्णी, गणेश शिरोडे, मुकुंद परदेशी यावेळी उपस्थित होते. किरण पुरंदरे, संजय कांबळे, वीरेंद्र चित्राव, प्रकाश म्हस्के, राहुल धडफळे, प्लास्ट इंडिया, पॅटपर्ट, अजित कुडे, फोर्ब्स मार्शल, किर्लोस्कर ऑईल इंजिन, डॉ. वाय. बी. सोनटक्के, पी. के. मिराशे, नंदकुमार गुरव, एमपीसीबी या व्यक्ती आणि संस्थांचा यावेळी सत्कार करण्यात येणार आहे.



रविवार, १२ जून २०१६ | वर्ष : २१ अंक : १३९ | पृष्ठे ८+८ | मूल्य : ४.०० रुपये | ★★ पुणे आवृत्ती
संस्थापक संपादक
ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक
सामना

## देशात भूजलाचे शोषण आणि प्रदूषण

– डॉ. हिमांशू कुलकर्णी

पुणे, दि. ११ (प्रतिनिधी) – देशासह महाराष्ट्रात भूजलाचे मोठ्या प्रमाणात शोषण आणि प्रदूषण झाल्याचे दिसून येते. पर्यावरण अभ्यासातही भूजलाला सर्वात शेवटी महत्त्व दिले जाते. गेल्या २० वर्षात देशभरातील वेगवेगळ्या ठिकाणाहून भूजलाच्या नमुन्यातील ८५ टक्के नमुने प्रदूषित असल्याचे दिसून आले. नागरिकांनी दृष्टिकोनात बदल करून पर्यावरणात भूजल या पाण्याच्या स्रोताचा संसाधनाच्या माध्यमातून विचार केला, तर भूजल व्यवस्थापनाला बळकटी मिळेल, असे मत जलअभ्यासक डॉ. हिमांशू कुलकर्णी यांनी आज व्यक्त केले.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा पुणे विभाग आणि एन्व्हायर्नमेंटल क्लब ऑफ इंडियातर्फे नॅशनल सॉलिड वेस्ट असोसिएशनचे अध्यक्ष अमिया कुमार साहू यांना 'पर्यावरणभूषण पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी क्लबचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. किरण कुलकर्णी, अध्यक्ष नितीन देशपांडे, सचिव अमोद घमंडे, खजिनदार गणेश शिरोडे उपस्थित होते. या कार्यक्रमात संजय कांबळे (लातूर), वीरेंद्र चित्राव, डॉ. वाय. बी. सोनटक्के, पी. के. मिराशे, नंदकुमार गुरव आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना गौरविण्यात आले.

डॉ. कुलकर्णी म्हणाले, संपूर्ण देश जवळपास पाणीसाठ्याच्या बाबतीत ८० ते ९५ टक्के भूजलावर अवलंबून आहे. ग्रामीण भागात हे प्रमाण ७० तर शहरी भागात ५० टक्के आहे. औद्योगिक वापरासाठी सुमारे ७० टक्के वापर भूजलातून होतो. देशात १ बिलियन लोक भूजलाचा वापर करतात. असे असले तरी बाटलीबंद पाणी, नळ, विहिरीच्या भूजलातील पाण्याचे ८० टक्के नमुने हे प्रदूषित असल्याचे दिसून आले आहे. भूजल व्यवस्थापनाचा बोऱ्या वाजल्यामुळे आज नागझिरासारख्या अभयारण्यातील प्राण्यांना पिण्याचे दुर्भिक्ष्य जाणवायला सुरुवात झाली आहे. पाण्याचा स्रोत म्हणून देशात सुमारे चार कोटी बोअरवेल्सचा वापर केला जातो, तर अनेक वर्षांपासून पाण्याचे दुर्भिक्ष्य अनुभवणाऱ्या महाराष्ट्रातील एकट्या मराठवाड्यात दोन हजार बोअरवेल्स आहेत, हा विरोधाभास आहे.

अमिया कुमार साहू म्हणाले, कचरा व्यवस्थापनाकडे प्रशासनासह नागरिकांचे मोठे दुर्लक्ष झाले आहे. नागरिकांच्या दृष्टिकोनात बदल होत नाही, तोपर्यंत पर्यावरणातील चांगले बदल शक्य नाही. नितीन देशपांडे यांनी प्रास्ताविक केले.

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
Download Apps : www.dainikprabhat.com or www.eprabhat.net
'पुणे । रविवार । दि. १२ जून २०१६ PRABHAAT । प्रेस रजिस्ट्रेशन नं. १६३९/१९५७, वर्ष ८५, अंक : १६१

## भूगर्भातील पाण्याचे ८५ टक्के नमुने प्रदुषित

### डॉ. कुलकर्णी : जलसाक्षरतेत भूजलाची मांडणी आवश्यक

पुणे, दि. ११ (प्रतिनिधी) - भूगर्भातील पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणात वाढत आहे. या पाण्याचा वापर ज्या प्रमाणे वाढत आहे, त्या प्रमाणात स्वच्छ पाण्याचे दुर्भिक्ष जाणवत आहे. देशभरात भूगर्भातील पाण्याच्या आलेल्या नमून्यांपैकी ८५ टक्के नमूने हे प्रदूषीत आढळले आहेत. यामुळे जलसाक्षरतेमध्ये भूजलाची मांडणी करण्यास अनन्य साधारण महत्व असल्याचे मत पर्यावरण अभ्यासक डॉ.हिमांशू कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि एनव्हायरमेंटल क्लब ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमानेनॅशनल सॉलिड वेस्ट असोसिएशनचे अध्यक्ष अमिया कुमार साहु यांना 'पर्यावरणभूषण' पुरस्कार देण्यात आला. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून कुलकर्णी बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष नितीन देशपांडे, डॉ.किरण कुलकर्णी, अमोद घमंडे, गणेश शिरोडे आदी उपस्थित होते.

कुलकर्णी म्हणाले, भूगर्भातील पाणी झऱ्याच्या रूपाने येते, याचीच पुढे नदी होते. देशभरात भूगर्भाच्या पाण्यावर ८० ते ८५ टक्के जनता अवलंबून आहे. ग्रामीण भागाचा विचार केल्यास भूगर्भातील पाण्याचा ७० टक्के वापर सिंचनासाठी केला जातो. तर शहरातही ५० टक्के भूगर्भातील पाणी वापरले जाते. उद्योगांबद्दल ठोस आकडेवारी नसली तरी ६० ते ७० टक्के उद्योग भूगर्भातील पाण्याचा वापर करतात.

#### वाघांनाही पाण्याचे दुर्भिक्ष्य

'देशभरात वाघांना पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवत आहे. अभयारण्यातील नैसर्गिक पाण्याचे स्रोत आटल्याने त्यांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. यामुळे सध्या अभयारण्यामध्ये कृत्रिम तलाव बांधून त्यामध्ये टँकरद्वारे पाणी टाकले जात असल्याचे डॉ. कुलकर्णी यांनी सांगितले.

देशभरात एक दशलक्ष भारतीय दररोज भूगर्भातील पाण्याचा वापर करता. यामूळे भूगर्भातील पाण्याला अनन्यसाधारण महत्व आहे. देशभरात चार कोटी बोअरवेल आहेत. मात्र पाण्याचे स्रोत मर्यादीतच आहेत. आपल जैवविविधता आणि पिक व्यवस्थापनाला जेवढे महत्व देतो तेवढे महत्व खडकांच्या विविधतेला दिले पाहिजे. ही खडकांची विविधताच भूगर्भातील पाण्याचा स्रोत असते. पाण्याचे वापरकर्ते वाढले असल्याने यापुढे पाण्याची उपलब्धता मात्र कमी होणार आहे.

यावेळी पर्यावरणपूरक कामगिरी राबविणाऱ्या संजय कांबळे, विरेंद्र चित्राव, किरण पुरंदरे, प्रकाश म्हस्के, राहुल धडफडे, अजित कुडे, डॉ.वाय.बी. सोनटक्के, पी.के. मिराशे, नंदकुमार गुरव आदींचा सत्कार करण्यात आला.

**Dr. Amiya Kumar Sahu , Founder President of NSWAI awarded as Paryavaran Bhushan by Maharashtra Pollution Control Board (MPCB) & Environmental Club of India (ECI) on 11 june,2016 at Patrakar Bhawan , Pune.**

लोकमत
महाराष्ट्राचा मानबिंदू
पृष्ठे : २० (१२+८) किंमत : ₹ ४.००
पुणे, सोमवार, दि. १३ जून २०१६

# स्वच्छ पाण्याचे दुर्भिक्ष चिंताजनक

## हिमांशु कुलकर्णी : अमिया कुमार साहू यांना पर्यावरण भूषण पुरस्कार

पुणे : आज केवळ पाण्याचेच नव्हे, तर स्वच्छ पाण्याचेही दुर्भिक्ष चिंताजनक आहे, असे मत जलतज्ज्ञ हिमांशु कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा पुणे विभाग आणि एन्व्हायर्मटल क्लब ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने नॅशनल सॉलिड वेस्ट असोसिएशनचे अध्यक्ष अमिया कुमार साहू यांना जागतिक पर्यावरणदिनानिमित्त यंदाचा 'पर्यावरण भूषण पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे माजी अध्यक्ष डी. टी. देवळे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून कुलकर्णी बोलत होते.



पुरस्कार : पर्यावरण भूषण पुरस्कारप्रसंगी (डावीकडून) किरण कुलकर्णी, डी. टी. देवळे, अमिया कुमार साहू, पी. के. मिश्रा व नितीन देशपांडे.

एन्व्हायर्मेंटल क्लब ऑफ इंडियाचे अध्यक्ष नितीन देशपांडे, संस्थापक अध्यक्ष डॉ. किरण कुलकर्णी, सचिव अमोद घमंडे, खजिनदार गणेश शिरोडे, मुकुंद परदेशी आदी उपस्थित होते.

◆ पर्यावरणपूरक कामगिरी करणारे आणि उपक्रम राबविणारे संजय कांबळे, वीरेंद्र चित्राव, किरण पुरंदरे, प्रकाश म्हस्के, राहुल धडफळे, प्लास्ट इंडिया, पॅटपर्ट, अजित कुडे, फोर्ब्ज मार्शल, किर्लोस्कर ऑईल इंजिन, डॉ. वाय.बी. सोनटक्के, पी.के मिराशे, नंदकुमार गुरव, एमपीसीबी यांना गौरविण्यात आले.

---

# अमिया कुमार साहू यांना 'पर्यावरणभूषण'



पुणे, ता. ८ : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ पुणे विभाग व एन्व्हायर्नमेंटल क्लब ऑफ इंडियातर्फे नॅशनल सॉलिड वेस्ट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अमिया कुमार साहू यांना 'पर्यावरणभूषण पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे.

पुरस्कार वितरण सोहळ्यात पर्यावरणपूरक कामगिरी करणारे आणि उपक्रम राबविणारे राज्यातील कारखाने, बांधकाम व्यवसाय कंपन्या, रुग्णालये आदींना स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. पुरस्काराचे वितरण शनिवार (ता. ११) होणार आहे, अशी माहिती क्लबचे अध्यक्ष नितीन देशपांडे यांनी दिली.

---

पुणे, सोमवार, १३ जून २०१६ । किंमत ₹ ४
सकाळ
पुणे । कोल्हापूर । नाशिक । मुंबई । औरंगाबाद । सोलापूर । नागपूर । सातारा । जळगाव । नांदेड । अकोला येथून प्रसिद्ध

# भूजलस्त्रोतांचे संवर्धन, पुनर्भरण महत्त्वाचे : कुलकर्णी

## अमिया कुमार साहू यांना पर्यावरणभूषण पुरस्कार प्रदान

"ग्रामीण भागातील ८०-८५ टक्के, सिंचनातील ७० टक्के, शहरी भागातील ५० टक्के आणि उद्योगक्षेत्रातील ६०-७० टक्के पाणी हे भूजलसाठ्यावर अवलंबून आहे. तर, गेल्या २० वर्षांत देशभरातील वेगवेगळ्या ठिकाणांहून घेतलेल्या भूजलाच्या नमुन्यांतील ८५ टक्के नमुने प्रदूषित असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे जलधोरणात भूजलस्त्रोतांचे संवर्धन, पुनर्भरण या मुद्द्यांना महत्त्व दिले पाहिजे," असे मत जल अभ्यासक हिमांशू कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा पुणे विभाग आणि एन्व्हायर्नमेंटल क्लब ऑफ इंडिया यांच्यावतीने नॅशनल सॉलिड वेस्ट असोसिएशनचे अध्यक्ष अमिया कुमार साहू यांना 'पर्यावरणभूषण पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी क्लबचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. किरण कुलकर्णी, अध्यक्ष नितीन देशपांडे, खजिनदार गणेश शिरोडे उपस्थित होते. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप होते. कार्यक्रमात संजय कांबळे (लातूर), वीरेंद्र चित्राव, डॉ. वाय. बी. सोनटक्के, पी. के. मिराशे, नंदकुमार गुरव यांना गौरविण्यात आले. या वेळी कुलकर्णी म्हणाले, "जलसाक्षरतेमध्ये भूजलाची मांडणी करण्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. हे घडवून आणण्यासाठी विचारात पूर्णपणे बदल झाला पाहिजे. भारतात सुमारे चार कोटी विहिरी असून, हा जगातील सर्वाधिक विहिरी असणारा देश आहे." या वेळी साहू म्हणाले, "आपल्याला उपयोगी नसलेल्या वस्तूला आपण कचरा म्हणतो; परंतु त्या वस्तू इतरांच्या उपयोगाच्या असू शकतात. सध्या देशाला घनकचऱ्याची समस्या भेडसावत असून, त्यातून मार्ग काढण्यासाठी 'झिरो वेस्ट मॅनेजमेंट'ला प्राधान्य द्यावे."